नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/12/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## मोटार पंप चोरीचा गुन्हा उघड

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर जिल्हा ग्रामीणची कार्यवाही :–

दिनांक ०८/१२/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक ०९/१२/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी धनराज विठोबा थोटे यांचे मौजा मधूबन हॉटेलच्या मागे मौदा येथे असलेल्या शेतामध्ये पाणी देण्यासाठी मोटारपंप एल एन टी कंपनीची ३ एच पी पानबुडी मोटार ३ महिन्यापुर्वी शेताच्या बाजूला असलेल्या पाण्याच्या पाटामध्ये लावली होती. दिनांक ०९/१२/२०२३ चे रोजी सकाळी ०६/०० वा. दरम्यान फिर्यादी हे दररोजप्रमाणे शेतामध्ये पाण्याची पाहणी करण्यासाठी गेले असता मोटारपंप एल एन टी कंपनीची ३ एच पी पानबुडी मोटार किंमती ४०००/–रूपये कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून पोस्टे मौदा येथे अप. क्र. ११९१/२३ कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपासात स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे पथक दिनांक १३/१२/२०२३ रोजी फरार पाहिजे आरोपी व पेट्रोलिंग कामी पो.स्टे. मौदा हद्दीत फिरत असता मुखबिरद्वारे खात्रीशीर माहिती मिळाली की, **आरोपी राकेश रमेश भरटकर वय ३५ वर्षे रा. माथनी** नावाचा इसम हा मोटरपंप विकण्याच्या तयारीत आहे. अशा माहितीचा आधारे नमूद आरोपीस माथनी शिवार येथील त्याचे राहते घरी सापळा रचुन ताब्यात घेऊन चोरी गेलेल्या पाण्याची मोटर पंपाबाबत विचारणा केली असता तो उडवा उडवीचे उत्तर देत असता त्यास विश्वासात घेवुन सखोल विचारपुस केली असता त्यांने सदरची पाण्याची मोटरपंप ही मौजा मधूबन हॉटेलच्या मागे मौदा येथे असलेल्या शेतामधुन चोरी केल्याची कबुली दिली. पुढे अधिक विचारपुस दरम्यान त्याने सदर मोटरपंप त्याचे साथीदार आरोपी नामे– प्रफुल्ल विलास गोणकर, वय २४ वर्ष, रा. माथणी यांचेसह चोरले असून मोटरपंप घरी असल्याचे सांगितले वरून पंचासमक्ष एल एन टी कंपनीची मोटरपंप किंमती ४०००/–रू. जप्त करून सदर मोटारपंप चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. सदर आरोपी यास मुद्देमालासह पुढील तपासकामी पो.स्टे. मौदा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक फौजदार नाना राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, पोलीस नायक वीरू नरड, संजय बरोदीया, मोनू शुक्ला यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर